प्रकरण ३

# राजीव गांधी कालखंड

## (Rajiv Gandhi : Period)



राजीव गांधी

राजीव गांधी (१९४४-१९९१) हे जगातील सर्वांत मोठ्या लोकशाही देशाचे-भारताचे-सर्वांत तरुण पंतप्रधान होते. ३१ ऑक्टोबर, १९८४ या दिवशी दिल्लीत पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांची हत्या झाली, तेव्हा राजीव गांधी बंगालमध्ये तर राष्ट्रपती ग्यानी झैलसिंग येमेनच्या दौऱ्यावर होते. ते दोघेही तातडीने राजधानीत परतले. तोपर्यंत काँग्रेस संसदीय बोर्डाने पंतप्रधान म्हणून राजीव गांधी यांची निवड केली होती. विमानतळावरून राष्ट्रपती हॉस्पिटलकडे येत असतानाच काँग्रेस नेत्यांनी संसदीय बोर्डाचा निर्णय राष्ट्रपतींना सांगितला. थोड्याच वेळात राष्ट्रपतींनी राजीव गांधींना राष्ट्रपती भवनात बोलावून घेतले. त्या वेळी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते प्रणव मुखर्जी, पी. व्ही. नरसिंहराव, बुटासिंग, पी. शिवशंकर, अरुण नेहरू राष्ट्रपती भवनात उपस्थित होते. ज्येष्ठ काँग्रेस नेते व त्या वेळी दिल्लीत असलेले बिहार, ओरिसा, मध्य प्रदेश, राजस्थान इत्यादी राज्यांच्या मुख्यमंत्र्यांनी राजीव गांधींच्या पंतप्रधान म्हणून झालेल्या निवडीला पाठिंबा दिला. इंदिरा गांधींच्या हत्येमुळे प्रक्षुब्ध झालेल्या जनसमुदायांनी इंदिराजींचे मारेकरी शीख असल्यामुळे राजधानीतील शिखांविरुद्ध दंगल सुरू केली. दिल्लीतील शीखविरोधी दंगल भीषण होती. अशा परिस्थितीत पंतप्रधानांची तातडीने नेमणूक करून शांतता राखण्याचे प्रयत्न करणे निकडीचे झाले होते. राजीव गांधी स्वतः पंतप्रधान पदाबाबत अनुत्सुक होते. त्यांच्या पत्नी सोनिया यादेखील राजीव यांनी हे पद स्वीकारू नये, या मताच्या होत्या. परंतु सर्व ज्येष्ठ नेत्यांनी राजीव यांचे मन वळविले. ३१ ऑक्टोबर, १९८४ रोजी रात्री राष्ट्रपती भवनातील 'अशोक हॉल' मध्ये दुःखी वातावरणातच राजीव गांधींना राष्ट्रपतींनी पंतप्रधान पदाची शपथ दिली.

३ नोव्हेंबरला काँग्रेस कार्यकारणीने, ५ नोव्हेंबरला संसदीय काँग्रेस पक्षाने राजीव गांधींच्या पंतप्रधान पदावर झालेल्या निवडीवर शिक्कामोर्तब केले. संकटकाळी पंतप्रधान निवडीच्या प्रश्नावरून काँग्रेस पक्षात सत्तास्पर्धा किंवा विरोधाचा लवलेशही नव्हता. १२ नोव्हेंबर रोजी काँग्रेस पक्षाने राजीव गांधींची पक्षाध्यक्ष म्हणून एकमुखाने निवड केली. त्यानंतर दुसऱ्याच दिवशी १३ नोव्हेंबर रोजी लोकसभेच्या निवडणुका डिसेंबर अखेरीस घेण्यात येतील, अशी त्यांनी घोषणा केली. पंतप्रधानपदी विराजमान झाले तेव्हा सद्वर्तनी, प्रामाणिक, सचोटीचे नेते अशी राजीव गांधींची प्रतिमा होती.

## राजीव गांधींचे पूर्वायुष्य

राजीव गांधी इंदिरा–फिरोज गांधी यांचे ज्येष्ठ पुत्र होते. ते इंडियन–एअरलाईन्सचे वैमानिक म्हणून १४ वर्षे कार्यरत होते. ते आपल्या कुटुंबासमवेत पंतप्रधानांच्या शासकीय निवासस्थानात राहत असले तरी त्यांना राजकारणात अजिबात रस नव्हता. त्या क्षेत्रापासून ते कटाक्षाने अलिप्त होते. जून, १९८० मध्ये त्यांचा धाकटा भाऊ संजय विमान अपघातात मरण पावला आणि आईच्या आग्रहास्तव तिला मदत करण्यासाठी राजीवजींनी राजकारणात प्रवेश केला. जन्माने इटालियन असलेल्या त्यांच्या पत्नी सोनिया याही राजीवनी राजकारणात उतरण्यास अनुकूल नव्हत्या. जून, १९८१ मध्ये उत्तर प्रदेशातील अमेठी या मतदार संघातून राजीव लोकसभेत निवडून आले आणि त्यांनी औपचारिकरित्या भारतीय राजकारणात उडी घेतली. १९८२ मध्ये दिल्ली येथे झालेल्या आशियाई क्रीडा स्पर्धांच्या संयोजनाची जबाबदारी त्यांच्यावर सोपविली होती आणि त्यांनी ती उत्तम रीतीने पार पाडली. १९८३ च्या फेब्रुवारी मध्ये त्यांना काँग्रेस पक्षाचे सरचिटणीस म्हणून नेमण्यात आले. पक्ष संघटना सशक्त करण्याची त्यांच्याकडे जबाबदारी देण्यात आली होती. ते आपल्या पक्ष संघटनेच्या कामात व्यग्र असतानाच नियतीने त्यांना देशाच्या पंतप्रधानपदी बसविले.

## १. दिल्लीतील शीखविरोधी दंगली

पंतप्रधान म्हणून शपथविधी होताच राजीव गांधींपुढे तातडीचा प्रश्न उभा ठाकला तो म्हणजे इंदिरा गांधींच्या हत्येमुळे राजधानीत शीख समुदायांविरुद्ध उसळलेल्या दंगलींना आळा घालण्याचा. आईचा मृत्यू व त्याबरोबर येणारे दुःख हे सर्व बाजूला ठेवून त्यांना वास्तवाला सामोरे जावे लागले. त्या वेळी राजधानीत आणि आजूबाजूच्या वसाहतीत सुडाच्या भावनेतून शीख समाजाविरुद्ध दंगली पेटल्या होत्या. ३१ ऑक्टोबर ते ३ नोव्हेंबर या काळात शिखांची घरे लुटली गेली; दुकाने भस्मसात झाली; त्यांच्या उद्योग व्यवसायांची राखरांगोळी झाली. या दंगलीत सुमारे २८०० शीख मारले गेले. या

हत्याकांडाला काँग्रेस पक्षातील काही स्थानिक नेते, कार्यकर्ते जबाबदार होते आणि ते दंगलखोर जमावाचे नेतृत्व करीत होते, असेही आरोप केले गेले. पोलिसांचे वर्तन पक्षपाती होते; अशीही टीका करण्यात आली. राजधानीतील दंगलीचे हे लोण उत्तर भारतातील कानपूर, बोकारो अशा काही शहरांत पसरले. शीखविरोधी दंगलींना आळा घालण्यासाठी राजीव गांधींनी दिल्लीच्या लेफ्टनंट गव्हर्नरना आवश्यक त्या सूचना दिल्या.

३ नोव्हेंबरला म्हणजे इंदिराजींच्या अंत्यसंस्काराच्या दिवशी सकाळी दिल्लीच्या तणावग्रस्त भागात राजीव गांधींनी स्वत: जाऊन लोकांना शांत केले. दूरदर्शनवरून केलेल्या भाषणातून त्यांनी जनतेला संकटकाळात शांतता राखण्याचे आवाहन केले. तसेच त्यांनी दंगलग्रस्त भागात लष्कर तैनात करण्याची कार्यवाही केली आणि शीखविरोधी राजधानीत भडकलेली दंगल अल्पावधीत शमली.

**२. १९८४ च्या निवडणुकीतील देदीप्यमान यश**

२४ ते २७ डिसेंबर या काळात देशात लोकसभेच्या निवडणुका पार पडल्या. लोकसभा निवडणुकीकरिता काँग्रेस पक्षाचे मुख्य प्रचारक राजीव गांधीच होते. प्रचार-काळात त्यांची देशासाठी अविश्रांत परिश्रम करण्याची क्षमता स्पष्ट झाली. इंदिरा गांधींच्या हत्येमुळे राजीव गांधी व काँग्रेस यांच्याबद्दल जनमानसात सहानुभूतीची प्रचंड लाट निर्माण झाली होती. त्याचा लाभ काँग्रेसला मिळाला. १९८४ च्या निवडणुकात राजीव गांधींच्या नेतृत्वाखाली काँग्रेसला अभूतपूर्व यश मिळाले. अमेठी मतदार संघात 'राजीव विरुद्ध मनेका' अशी लढत झाली. त्यात राजीव प्रचंड बहुमताने विजयी झाले. या निवडणुकीत लोकसभेच्या मतदान झालेल्या ५१५ जागांपैकी ४०१ जागा काँग्रेसने जिंकल्या. देशाच्या एकात्मतेला धोका आहे, या मुद्द्यांवर राजीव गांधींनी १९८४ च्या लोकसभा निवडणुका लढविल्या आणि त्यात पक्षाला उदंड यश मिळवून दिले.

**अंतर्गत हिंसाचारावर उपाययोजना**

राजीव गांधी सत्तेवर आले त्या वेळी देशाची परिस्थिती अत्यंत बिकट होती व १९८० नंतरच्या काळात पंजाब, आसाम, उत्तर बंगाल, मिझोराम अशा सीमावर्ती राज्यांत उफाळून येत असलेल्या बंडखोरीला व हिंसाचाराला आवर घालणे ही सरकारसाठी एक अत्यंत गंभीर समस्या बनली होती. राजीव गांधींनी पंजाब, आसाम आणि मिझोराम यांच्याबाबत तीन वेगवेगळे करार करून या समस्येचे निराकरण करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला.

**(अ) पंजाब करार (१९८५) :** पंजाब समस्या म्हणजे पंतप्रधान राजीव गांधी यांच्या

समोर एक मोठेच आव्हान होते. त्या समस्येतून मार्ग काढण्यासाठी डिसेंबर, १९८४ मध्ये सार्वत्रिक निवडणुका झाल्यावर त्यांनी लगेचच हालचाल सुरू केली. जानेवारी, १९८५ मध्ये अकाली दलाचे अध्यक्ष हरचंदसिंग लोंगोवाल यांच्यासह तुरुंगातील सर्व प्रमुख अकाली पुढाऱ्यांना सोडण्यात आले. त्यानंतर राजीव गांधींनी पंजाबातील मवाळ शीख नेत्यांशी वाटाघाटी केल्या. त्याची फलश्रुती अकाली दलाचे अध्यक्ष संत हरचंदसिंग लोंगोवाल व राजीव गांधी यांच्यात २४ जुलै, १९८५ रोजी करार होण्यात झाली. त्या करारने पंजाबात शांतता प्रस्थापित होईल, अशी आशा वाटल्याने त्या वेळी तो करार ऐतिहासिक महत्त्वाचा मानला गेला.

**कराराची कलमे :** (१) मवाळ शीख नेत्यांच्या बहुतेक सर्व महत्त्वाच्या मागण्यांना मान्यता देण्यात आली. (२) पंजाबला स्वायत्तता देणे या व बाकीच्या मागण्यांचे परीक्षण करण्याचे वचन दिले. (३) चंदीगढ पंजाबला दिले जाईल, पंजाबकडून हरियानाकडे कोणते हिंदी भाषिक प्रदेश हस्तांतरित करावयाचे ते एक आयोग ठरवील. (४) रावी व बियास नद्यांच्या पाणी वाटपाच्या तंट्याचा निर्णय एक स्वतंत्र लवाद समिती करील असे ठरविण्यात आले. (५) राज्यविधानसभेच्या आणि संसदेच्या निवडणुका सप्टेंबर, १९८५ मध्ये घेण्याचे ठरले.

हा करार झाल्यापासूनच पंजाब व हरियाना या दोन्ही राज्यांत काही गटांकडून त्याला कडवा विरोध सुरू झाला. संत लोंगोवाल यांनी २० ऑगस्ट, १९८५ या दिवशी अकाली निवडणुकांमध्ये भाग घेतील असे जाहीर केले. परंतु त्याच दिवशी त्यांचा दहशतवाद्यांकडून खून झाला. तथापि, ठरलेल्या वेळी म्हणजे २५ सप्टेंबर, १९८५ रोजी पंजाबात विधानसभेच्या निवडणुका पार पडल्या. स्वातंत्र्योत्तर काळात प्रथमच स्वतःच्या बळावर बर्नाला यांच्या नेतृत्वाखाली अकाली पंजाबात सत्तेवर आले. काँग्रेसचा पंजाबच्या निवडणुकीत धक्कादायक पराभव झाला. पंजाबातील दहशतवादाला आळा घालण्यात बर्नाला सरकार अपयशी ठरले. डिसेंबर, १९८६ पर्यंत पंजाब समस्येचा गुंता तसाच कायम होता. १९८६ नंतर राजीव गांधी शासनाने दहशतवाद्यांवर कित्येक वेळा मात केली होती. परंतु राजीव गांधी शासनाने दहशतवाद्यांवर मात केल्याचे स्पष्ट होण्यापूर्वीच निर्धाराअभावी त्यांच्या शासनाने कोणत्या ना कोणत्या फुटीरतावादी गटाशी वाटाघाटी सुरू करून पंजाबमधील दहशतवाद समाप्त करण्याची संधी गमावली.

**(ब) आसाम करार (१९८५) :** आसाम राज्यातील समस्येची उकल करण्याच्या दृष्टीने राजीव गांधींनी आसाममधील ऑल आसाम स्टुडंस् युनियन (आसू) व ऑल आसाम गणसंग्राम परिषद या संघटनेच्या नेत्यांना वाटाघाटीसाठी दिल्ली येथे पाचारण

केले. उभयपक्षात बऱ्याच बैठका व चर्चेच्या फेऱ्या होऊन १५ ऑगस्ट, १९८५ रोजी आसाम कराराच्या अटी निश्चित झाल्या. राजीव गांधी व आसामच्या त्या संघटनांचे नेते यांच्या त्या करारावर स्वाक्षऱ्या झाल्या.

राजीव गांधी शासनाने आसाम आंदोलनाच्या नेत्यांशी केलेल्या करारानुसार असे ठरले की, (१) १९५१ ते १९६१ पर्यंत आसाममध्ये आलेल्या सर्व परकीयांना मताधिकारासह पूर्ण नागरिकत्व द्यायचे. (२) १९६१ ते १९७१ पर्यंत आलेल्यांना नागरिकत्व द्यायचे परंतु १० वर्षे मतदानाचा अधिकार द्यावयाचा नाही. (३) १९७१ नंतर आलेल्या सर्वांना हद्दपार करावयाचे. (४) या करारानुसार आसाममध्ये आणखी एक तेलशुद्धीकरण प्रकल्प, कागद गिरणी आणि तंत्रविज्ञानसंस्था सुरू करण्याचा समावेश असलेली योजना आखण्यात आली. (५) आसामींचे सांस्कृतिक, सामाजिक आणि भाषिक व्यक्तिमत्त्व जतन करण्यासाठी केंद्राने वैधानिक आणि प्रशासकीय संरक्षण देण्याचे मान्य केले.

आसाममध्ये विधानसभा बरखास्त करून डिसेंबर, १९८५ मध्ये निवडणुका घेण्यात आल्या. तोपर्यंत आसाममध्ये काँग्रेसचेच काळजीवाहू सरकार होते. आंदोलनाच्या नेत्यांनी स्थापन केलेला आसाम गणपरिषद हा नवा पक्ष १२६ पैकी ६४ जागा जिंकून सत्तेवर आला. 'आसू' पक्षाचा ३२ वर्षांचा नेता प्रफुल्लकुमार महंता स्वतंत्र भारतातील सर्वांत तरुण मुख्यमंत्री बनला.

आसाम करारामुळे सुमारे सहा वर्षे चाललेले आसाममधील हिंसक आंदोलन थांबले. मात्र तेथील बंगाली मुस्लीम, काँग्रेस व राजीव गांधी यांच्यावर चिडले. आसाममधून बिगर आसामी कुटुंबे मोठ्या संख्येने बंगालमध्ये येतील या भीतीने बंगाल सरकार अस्वस्थ झाले. निवडणुकीतील पराभवामुळे ईशान्य भारतातील आसाम हा काँग्रेसचा बालेकिल्ला ढासळला. आसाम करारातील अटींना त्वरित मूर्त स्वरूप द्यावे यासाठी डिसेंबर, १९८६ मध्ये सुरू झालेल्या आंदोलनाला आसाम गणपरिषद सरकारला तोंड द्यावे लागले. युनायटेड लिबरेशन फ्रंट ऑफ आसाम (उल्फा ULFA) या संघटनेच्या सरकारविरोधी आंदोलनामुळे आसाममध्ये अशांतता व अस्थिरता चालूच राहिली.

**(क) मिझोराम करार (१९८६) :** मिझोराम या ईशान्येकडील राज्यात 'मिझो नॅशनल फ्रंट' या संघटनेच्या नेतृत्वाखाली स्वायत्ततेसाठी अनेक वर्षे आंदोलन व बंडखोरी चालू होती. मिझोराममधील असंतोष नाहीसा होऊन तेथे शांतता प्रस्थापित व्हावी या उद्देशाने राजीव गांधींनी मिझो नेत्यांशी वाटाघाटी केल्या. त्यामधून २६ जुलै, १९८६ रोजी 'मिझोराम करार' अस्तित्वात आला.

या कराराने मिझोराम राज्याला खास दर्जा देण्यात येऊन धर्म व सामाजिक चालीरीती,

रूढी, लोकजीवनात रूढ असलेला कायदा, जमिनीची विक्री व हस्तांतरण या सर्व बाबतीत कायदे करण्याबाबत स्वायत्तता देण्यात आली. या करारानंतर मिझोराममध्ये मिझो नॅशनल फ्रंट व काँग्रेस (इं) यांचे संमिश्र सरकार लोकप्रिय मिझोनेते लाल डेंगा यांच्या नेतृत्वाखाली सत्तेवर होते. फेब्रुवारी, १९८७ मध्ये झालेल्या निवडणुकीत काँग्रेसचा पराभव होऊन 'मिझो नॅशनल फ्रंटचे' सरकार सत्तेवर आले.

मिझोकरार म्हणजे फुटीरवाद्यांचा अनुनय आहे, त्यामुळे देशात इतरत्रही फुटीरतेला प्रोत्साहन मिळून तशा मागण्या पुढे येऊ लागतील, अशी टीका त्या करारावर लोकदल व भारतीय जनता पक्षाने केली. त्या करारानंतर अल्पावधीतच दार्जिलिंग जिल्ह्याच्या 'गुरखा नॅशनल लिब्रेशन फ्रंटने' स्वतंत्र गुरखा लँड राज्याच्या निर्मितीकरिता हिंसक आंदोलन सुरू केले.

डिसेंबर, १९८६ मध्ये गोवा या केंद्रशासित प्रदेशात गोव्यांचे वेगळे राज्य निर्माण करण्यासाठी तेथील लोकांनी चळवळ सुरू केली.

## काँग्रेसचे शताब्दी अधिवेशन

डिसेंबर, १९८५ मध्ये काँग्रेसच्या शताब्दी निमित्ताने मुंबईत आयोजित केलेल्या शताब्दी महोत्सवात राजीव गांधींनी केलेले भाषण टीकाकार व प्रशंसक अशा सर्वांना धक्का देणारे होते. काँग्रेस पक्षात बोकाळलेला भ्रष्टाचार, संधिसाधू नेतृत्व, नव्या कर्तृत्ववान व्यक्तींना पक्षात वाव देऊन पक्ष बळकट करण्याबाबत दिसून येत असलेली उदासीनता अशा दोषांवर त्यांनी उघडपणे टीका केली. पक्षातील दलालांची मक्तेदारी संपुष्टात आणून काँग्रेस पक्षात नवचैतन्य ओतण्याचा मनोदय त्यांनी जाहीर केला. भारत सरकारला अधिक गतिशील बनवून, भारताची सर्वांगीण प्रगती साधून नव्या आत्मविश्वासाने २१ व्या शतकात पदार्पण करण्यासाठी राष्ट्राला समर्थ करण्याचा त्यांचा निर्धारही त्यांनी आपल्या भाषणात व्यक्त केला. राजीव गांधी यांच्या नेतृत्वाकडे राष्ट्र नव्या आशेने पाहू लागले. मात्र पक्षांतर्गत निवडणुका घेण्याच्या बाबतीत ते पंतप्रधान असूनही अयशस्वी ठरले.

## अंतर्गत सुधारणा

प्रारंभीच्या अडचणी वगळता राजीव गांधींच्या राज्यकारभाराचा प्रारंभ सकारात्मक झाला. त्यांनी देशाची विविध क्षेत्रांत प्रगती घडवून आणण्यासाठी अनेक नवीन धोरणे आखली आणि कार्यक्रम ठरविले. राजीव गांधींच्या कारकिर्दीतील सर्वांत संस्मरणीय बाब म्हणजे सहा तंत्रज्ञान क्षेत्रांची उभारणी.

**१. तंत्रज्ञान क्षेत्रांची उभारणी :** अविकसित अशी सहा क्षेत्रे निवडून तेथे विज्ञान व

तंत्रज्ञान क्षेत्रातील ज्ञानाचा, अनुभवाचा उपयोग करावयाचा आणि वैज्ञानिक पद्धतीने त्या क्षेत्राचा विकास साधावयाचा, असा या कार्यक्रमाचा उद्देश होता. भारत २१ व्या शतकाच्या उंबरठ्यावर असतानाच या कार्यक्रमांच्या बहुतेक उद्दिष्टांची पूर्तता करावयाची होती. भारताने नवीन सहस्रकात एक आधुनिक राष्ट्र म्हणून प्रवेश करावा हा राजीव गांधींचा त्यामागे दृष्टिकोण होता. त्यांनी निवडलेले सहा विधायक कार्यक्रम पुढीलप्रमाणे होते.

***(अ) पिण्याचे स्वच्छ पाणी :*** 'सर्वांसाठी पिण्याचे स्वच्छ पाणी' हा देशातील सर्वांत महत्त्वाचा कार्यक्रम होता. भारतातील सर्व खेड्यांत पिण्याच्या पाण्याचा पुरवठा व्हावा ही या कार्यक्रमामागची प्रेरणा होती. उपग्रहांचा उपयोग, भूगर्भशास्त्र, नागरी अभियांत्रिकी आणि जीव-रसायनशास्त्र यांच्या मदतीने जलस्रोत ओळखणे व शुद्ध पाण्याचा पुरवठा करणे अशी ही संकल्पना होती.

***(ब) साक्षरता :*** देशाला स्वातंत्र्य मिळून चार दशके उलटूनसुद्धा भारतात जवळजवळ साठ टक्के लोक निरक्षर होते. निरक्षरतेचा कलंक दूर करण्याकरिता दूरचित्रवाणी व दृक्श्राव्य माध्यमाची इतर साधने वापरून प्रयत्न केले जाणार होते. देशातील साक्षरता प्रसाराची मोहीम अत्यंत महत्त्वाची असल्याचे कालांतराने सिद्ध झाले. या मोहिमेतूनच 'संपूर्ण साक्षरता अभियाना'चा जन्म झाला आणि या अभियानाद्वारे झालेल्या कामामुळे देशाच्या अनेक भागांतील निरक्षरतेचे प्रमाण बरेच घटले.

***(क) लसीकरण कार्यक्रम :*** या योजनेअंतर्गत गर्भवती स्त्रिया व मुले यांच्यासाठी व्यापक लसीकरण मोहीम हाती घेण्यात येणार होती. पोलिओसारख्या रोगापासून लहान मुलांचे रक्षण होण्यासाठी हाती घेतलेली लसीकरणाची मोहीम हे त्या कार्यक्रमाचेच अंग होते.

***(ड) श्वेत क्रांती :*** श्वेत क्रांती म्हणजे देशात दुधाचा भरपूर पुरवठा किंवा दुधाचा महापूर होय. दूध देणाऱ्या जनावरांचे आरोग्य जपणे आणि दूध उत्पादन वाढविणे याचा या कार्यक्रमात समावेश होता.

***(इ) खाद्यतेलाचे उत्पादन :*** भारत बराच काळ खाण्याचे तेल बाहेरून आयात करीत असे. त्यामुळे देशाचे बरेच परकीय चलन या आयातीवर खर्च होई. राजीव गांधींच्या प्रेरणेने देशाने खाद्यतेलाच्या निर्मितीत केलेल्या प्रगतीमुळे व उत्पादनवाढीमुळे देशाच्या परकीय चलनाची बचत होण्यास मदत झाली.

***(ई) दूरसंचार माध्यमांचा विकास :*** २० व्या शतकाच्या अखेरीला देशातील प्रत्येक खेड्यात एक तरी दूरध्वनी असावा असे उद्दिष्ट ठरवून या महत्त्वाकांक्षी कार्यक्रमाची आखणी करण्यात आली होती.

२. **तंत्रज्ञानातून विकास :** तंत्रज्ञानाचा विकासासाठी उपयोग करणे हा दृष्टिकोण सॅम पित्रोदा या अमेरिकेत प्रशिक्षण घेतलेल्या भारतीय संशोधकाने पुढे आणला. दूरसंचार क्षेत्रात त्यांनी क्रांती घडवून आणली. राजीव गांधी पंतप्रधान झाल्यानंतर त्यांनी सॅम पित्रोदा यांची देशाच्या तंत्रज्ञान मोहिमेचे सल्लागार आणि दूरसंचार मंडळाचे प्रमुख म्हणून नियुक्ती केली. त्यांनी भारतात विकास कार्यक्रमाच्या अंमलबजावणीत तंत्रज्ञानाचा मोठ्या प्रमाणात वापर करून देशातील विकास प्रक्रिया गतिमान केली.

३. **संगणकीकरण कार्यक्रम :** राजीव गांधी यांनी देशातील संगणक कार्यक्रमाला सर्वांत महत्त्वाचे स्थान दिले. संगणकीकरण कार्यक्रम जरी इंदिरा गांधींच्या कारकिर्दीत तयार झाला असला तरी तो व्यापक प्रमाणावर अमलात आणला राजीव गांधी यांनीच. संगणकाच्या आयात करात सरकारने सूट दिली. त्यामुळे संगणकाच्या सुट्या भागांच्या निर्मितीला देशात प्रोत्साहन मिळाले. राजीवजींच्या नेतृत्वामुळे देशभरातील कार्यालये आणि शैक्षणिक संस्थांमध्ये संगणकाच्या वापराला चालना मिळाली. प्रारंभी देशातील कामगार संघटनांनी कामकाजातील संगणकाच्या वापराला बेकारी निर्माण होण्याच्या भीतीमुळे विरोध केला होता. मात्र राजीव गांधींनी भविष्यकाळाचा विचार करून देशातील संगणक क्षेत्राला सक्रिय साहाय्य केले. त्यांच्या दूरदृष्टीमुळे भारत आज संगणक क्षेत्रात अग्रेसर असून देशाला त्यातून भरपूर परकीय चलन मिळते. **औद्योगिक क्रांतीचा भारताला फायदा झाला नाही मात्र माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील क्रांतीचा आपण फायदा करून घेतला पाहिजे या विचाराचा राजीव गांधींनी जोरदार पुरस्कार केला. तो विचार प्रत्यक्ष अमलात यावा यासाठी त्यांनी अनेक प्रगतिशील पावले उचलली.**

४. **जवाहर रोजगार योजना :** ग्रामीण गरीब जनतेच्या उन्नतीसाठी राजीव गांधी सरकारने १९८९ साली सुरू केलेली एक महत्त्वाची योजना म्हणजे 'जवाहर रोजगार योजना'. खेड्यातील प्रत्येक गरीब कुटुंबातील एका व्यक्तीला तरी वर्षातून ५० ते १०० दिवस काम पुरविणे असे या योजनेचे उद्दिष्ट होते. देशाचे पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांच्या जन्मशताब्दीनिमित्त राजीव सरकारने ही योजना सुरू केली होती. त्या योजनेवर होणारा ८० टक्के खर्च केंद्र सरकार सोसणार होते.

५. **नवीन शैक्षणिक धोरण :** राजीव गांधींच्या कारकिर्दीत १९८६ साली देशाचे नवीन शैक्षणिक धोरण जाहीर करण्यात आले. त्या धोरणाचा रोख ग्रामीण विभाग व गरीब जनता यांच्या हिताकडे होता. शाळांना आवश्यक ते शैक्षणिक साहित्य पुरवण्यासाठी **'ऑपरेशन ब्लॅकबोर्ड'** या कार्यक्रमाची आखणी केली होती. दूरशिक्षण योजनाही नवीन शैक्षणिक धोरणात समाविष्ट केलेली होती. शैक्षणिक धोरणानुसार देशातील प्रत्येक

जिल्ह्यात उघडण्यात यावयाच्या **'नवोदय विद्यालय'** योजनेवर बरीच टीका झाली. नवोदय विद्यालय योजना उच्चभ्रू लोकांसाठी आहे असा त्या टीकेचा सूर होता. ग्रामीण भागातील हुशार विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे या उद्देशाने वसतिगृह असलेल्या नवोदय विद्यालयांची रचना करण्यात आली होती. अंगभूत हुशारी या एकाच निकषावर नवोदय विद्यालयात विद्यार्थी निवडण्याचे धोरण होते.

**६. महिलांकरिता राष्ट्रीय योजना :** भारत सरकारने १९८८ मध्ये देशातील महिलांकरिता एक राष्ट्रीय योजना तयार केली. पंचायत संस्थांमध्ये महिलांकरिता ३० टक्के जागा राखीव ठेवण्याची तरतूद या योजनेत करण्यात आली होती. समाजातील निम्नस्तरावर कार्य करणाऱ्यांमध्ये ५० टक्के स्त्रिया असाव्यात, अशीही शिफारस करण्यात आली होती. स्त्रियांचे आरोग्य व शिक्षण याचाही राष्ट्रीय योजंनेत विचार करण्यात आला होता. हुंडाविषयक गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी अधिक कठोर शिक्षेची तरतूद असणारे कायदे १९८६ साली मंजूर करण्यात आले.

**७. पर्यावरण :** 'पर्यावरण संवर्धन व संरक्षण' हा राजीव गांधींचा एक आवडीचा विषय होता. राजीव गांधींच्या कारकिर्दीत **'गंगा नदी शुद्धीकरण'** कार्यक्रम हाती घेण्यात आला. गंगा ही भारतातील सर्वांत पवित्र नदी मानली जाते, परंतु अनेक ठिकाणी अविचारीपणे तिचे पाणी दूषित केले जाते. त्यामुळे राजीव गांधींच्या कारकिर्दीत गंगा नदीच्या शुद्धीकरणाची व्यापक मोहीम हाती घेण्यात आली होती.

राजीव गांधींनी केंद्र सरकारचे **पर्यावरण** हे नवीन खाते सुरू केले. देशात कोणतेही मोठे प्रकल्प उभारताना त्याला या खात्याची मान्यता घेणे आवश्यक ठरविण्यात आले.

**८. पक्षांतर बंदी कायदा :** राजकीय व्यवस्थेतील ज्या उणिवा आणि दोष जनतेला अनुभवाला येतात ते नाहीसे करण्याला राजीव गांधींनी प्राधान्य दिले. त्यासाठी त्यांनी कारभारात पारदर्शकता आणली आणि कायदे करून व इतर मार्गांनी त्यांनी गुन्हेगारांवर अंकुश ठेवण्याचा प्रयत्न केला. अशा कायद्यांपैकी **'पक्षांतर्गत बंदीचा कायदा'** अत्यंत महत्त्वाचा होता. १९८५ साली विरोधी पक्षांशी चर्चा करून हा कायदा संमत करण्यात आला. त्या कायद्यातील तरतुदीनुसार संसदेतील कोणत्याही राजकीय पक्षातील $\frac{1}{3}$ सदस्य पक्ष सोडून गेले तरच त्यांना स्वतंत्र पक्ष म्हणून मान्यता मिळू शकेल; अन्यथा पक्ष बदलणाऱ्या संसद सदस्याचे सदस्यत्व रद्द होईल, अशी तरतूद या कायद्यात होती. **भारतीय राजकारणातील 'दलबदलू प्रवृत्ती' व सदस्यांच्या निष्ठांची खरेदी–विक्री याला आळा घालणे हा या कायद्याचा हेतू होता.**

**९. देशाची सांस्कृतिक प्रतिष्ठा :** राजीव गांधी यांनी ...

प्रतिष्ठा जागतिक पातळीवर वाढावी यासाठी महत्त्वाचे प्रयत्न केले. देशाच्या सात विविध भागांत विभागीय सांस्कृतिक केंद्रे उभारून स्थानिक तसेच प्रादेशिक सांस्कृतिक वैशिष्ट्यांना राजीव सरकारने प्रोत्साहन दिले. त्यांनी पश्चिमी देशात भारतीय कलांचे उत्सव आयोजित करण्यास सुरुवात केली. राजीव गांधींनी भारताबाहेर जे सांस्कृतिक महोत्सव आयोजित केले होते त्यामुळे जगाच्या सांस्कृतिक नकाशावर भारतास चांगला उठाव प्राप्त झाला होता. तथापि, राजीव गांधींच्या सांस्कृतिक धोरणाबाबत अनेक जणांनी त्यांच्यावर टीका केली. परदेशात भारतीय कलांचे उत्सव आयोजित करणे हे खर्चाचे व अयोग्य असल्याची टीका काहींनी केली.

**सरकारी माध्यमांना अधिक स्वातंत्र्य, दूरदर्शनला स्वायत्तता, ग्राहक संरक्षक कायदा** आणि **लोकन्यायालये** असे आणखी काही नवीन उपक्रम राजीव गांधींच्या अंतर्गत सुधारणा कार्यक्रमात समाविष्ट होते. अशा उपक्रमांमुळे राजीवजींची प्रतिमा 'मि. क्लीन' अशी बनली व ती तशीच जनमानसात ठसली.

## परराष्ट्र धोरण

परराष्ट्र व्यवहार क्षेत्रात पुढाकार घेऊन राजीव गांधींनी अनेक नावीन्यपूर्ण उपक्रम सुरू केले. त्यांनी अनेक लहान-मोठ्या देशांना सदिच्छा भेटी दिल्या. तसेच त्यांनी अनेक आंतरराष्ट्रीय परिषदांत सक्रिय भाग घेतला. परराष्ट्र धोरणाच्या क्षेत्रात त्यांनी आपला वेगळा असा ठसा उमटविला. आण्विक शस्त्रबंदीचा त्यांनी हिरीरीने पुरस्कार केला. वांशिक श्रेष्ठतेच्या धोरणाविरुद्ध दक्षिण आफ्रिकेत चालू असलेला लढा हा राजीव गांधींच्या आस्थेचा विषय होता. त्यामुळेच त्यांनी दक्षिण आफ्रिकेतील वर्णविद्वेषा-विरुद्धच्या लढ्याला पाठिंबा दिला. आफ्रिकेतील नामिबियाचे स्वातंत्र्य हा राजीवजींच्या जिव्हाळ्याचा विषय होता. नामिबियाच्या स्वातंत्र्य चळवळीला त्यांनी आपला पाठिंबा जाहीर केला होता. १९९० साली नामिबियाला स्वातंत्र्य मिळाले; मात्र त्या वेळी राजीव गांधी पंतप्रधान नव्हते; तरीही ते स्वातंत्र्य सोहळ्यास उपस्थित राहिले. योगायोगाने तेथे त्यांची नेल्सन मंडेला यांच्याशी भेट झाली.

### १. महासत्तांशी संबंध

राजीव गांधींच्या कारकिर्दीत अमेरिका व सोविएत रशिया या दोन्ही महासत्तांशी असलेले भारताचे संबंध अधिक सुधारले, परंतु त्यात फार मोठे स्थित्यंतर घडून आले नाही. १९८५ साली राजीव गांधींनी अमेरिकेला दिलेली भेट यशस्वी ठरली. अमेरिकेचे तत्कालीन अध्यक्ष रोनाल्ड रेगन यांच्याशी झालेली त्यांची चर्चा उपयुक्त ठरली. त्या वेळी हवामान माहितीचे विश्लेषण करण्याकरिता महासंगणक देण्याची त्यांनी अध्यक्ष

रेगन यांना विनंती केली. तत्कालीन आंतरराष्ट्रीय परिस्थितीमुळे अमेरिकेच्या भारताविषयीच्या धोरणात फार मोठा बदल होण्याची शक्यता नव्हती.

गोर्बाचेव्ह रशियात सत्तेवर आल्यानंतर राजीव गांधींनी त्यांची भेट घेऊन त्यांच्याशी विस्तृत चर्चा केली. त्या चर्चेत गोर्बाचेव्हदेखील नि:शस्त्रीकरणाच्या बाजूचे होते, हे राजीवजींना समजले. गोर्बाचेव्ह हे शांततावादी आहेत हे राजीव गांधींनी ओळखले होते. त्यामुळेच गोर्बाचेव्ह यांच्याशी राजीव गांधींचे निकटचे संबंध प्रस्थापित झाले. पाच वर्षांच्या कालावधीत ते दोन नेते आठ वेळा एकमेकांना भेटले होते.

**शेजारी राष्ट्रांशी संबंध**

**(अ) चीनला भेट :** १९८८ मध्ये राजीव गांधींनी चीनला भेट दिली. १९५४ मधील नेहरूंच्या चीन भेटीनंतर चीनला भेट देणारे ते पहिलेच भारतीय पंतप्रधान ठरले. **'राजीव-डेंग'** भेट घडून आली हीच एक अभूतपूर्व घटना होती. १९८६ मध्ये सरहद्दीवर झालेल्या कुरबुरीमुळे भारत-चीन संबंध अचानक दुरावले होते. दोन्ही देशांदरम्यानच्या प्रलंबित समस्या वाटाघाटीद्वारे सोडविणे; परस्परांशी व्यापारी संबंध वाढविणे आणि परराष्ट्र संबंध अधिक मजबूत करणे या उद्दिष्टांचा पुरावा करण्यासाठी राजीव गांधींची १९८८ मधील चीनची भेट उपयुक्त ठरली.

**(ब) बांगला देश :** राजीव गांधी यांच्या पंतप्रधान पदाच्या काळात भारताचे बांगला देश, नेपाळ व पाकिस्तान या शेजारी देशांशी असलेले संबंध फारसे चांगले नव्हते. बांगला देश दिवसेंदिवस इस्लामी मूलतत्त्ववादाकडे झुकत चाललेला होता. दोन देशांदरम्यानचे नद्यांच्या पाण्यासंबंधीचे तंटे सुटलेले नव्हते.

**(क) नेपाळ :** नेपाळमध्ये भारतीय वस्तूंवर प्रचंड आयात कर लादलेला होता; उलट, चिनी वस्तूंच्या आयातीवर सवलती होत्या. **भारतीय नागरिकांना नेपाळमध्ये 'वर्क परमिट' घेण्याची सक्ती करण्यात येत होती. मात्र त्याच वेळी लाखो नेपाळी कोणत्याही परवान्याशिवाय भारतात राहात होते.** १९८८ मध्ये चीनमधून नेपाळला लष्करी साहित्य आयात होत होते. त्यामुळे भारताचे नेपाळशी संबंध दुरावले होते. मार्च, १९८९ मध्ये भारत सरकारने नेपाळवर आर्थिक नाकेबंदी लादल्यानंतर त्यातून मार्ग काढण्यासाठी सप्टेंबर, १९८९ पासून भारत-नेपाळ चर्चा सुरू झाल्या.

**(ड) मालदीव :** महासागरातल्या **मालदीव** या छोट्या देशात १९८८ मध्ये सरकारविरुद्ध बंड झाले. मालदीवने भारताकडे लष्करी मदत मागितली. राजीव गांधींनी तेथे भारतीय सैन्य वेळेवर पाठवून मालदीव सरकारविरुद्धचा कट उधळून लावला.

**(इ) पाकिस्तान :** बेनझीर भुत्तो पाकिस्तानच्या पंतप्रधान झाल्यानंतरही भारत-पाकिस्तान संबंधात फारशी सुधारणा झाली नाही. राजीव गांधींनी बेनझीर यांच्या निमंत्रणावरून पाकिस्तानला भेट दिली. तरीपण काश्मीर, पंजाबमधील पाकिस्तानच्या छुप्या विध्वंसक कारवाया चालूच राहिल्या.

**(ई) श्रीलंका समस्या :** श्रीलंका हा भारताचा एक शेजारी देश! दोन्ही देशांचे परस्परसंबंध सलोख्याचे होते. श्रीलंकेची अंतर्गत परिस्थिती गुंतागुंतीची होती आणि त्या देशाचे प्रश्न वेगळे होते. त्या देशाच्या बाबतीत भारत कठीण परिस्थितीत दीर्घकाळ अडकून पडला होता. श्रीलंकेतील तमिळ जनसमुदायाचा प्रश्न १९८३ पासून गंभीर बनला. **श्रीलंकेतील 'जाफना' हा तमिळ बहुसंख्यांक जिल्हा.** श्रीलंकेतील तमिळी लोकांना स्वायत्तता मिळावी म्हणून संघर्ष करणाऱ्या **एलटीटीई** (Liberation Tigers of Tamil Elam-LTTE) या संघटनेचा जाफना बालेकिल्ला होता. श्रीलंका सरकारने तमिळ जनतेची स्वायत्ततेची मागणी धुडकावून लावली आणि जाफना भागात प्रचंड दडपशाही सुरू केली. त्यामुळे हजारो तमिळ नागरिक निर्वासित होऊन भारतात आश्रयाला आले. त्या तमिळ लोकांच्याबद्दल तमिळनाडूमधील लोकांना स्वाभाविकपणे सहानुभूती वाटत होती. श्रीलंकेतील अभागी तमिळींसाठी भारताने काही तरी करावे, अशी तामीळनाडूमधील स्थानिक जनतेची भावना होती. भारताने अन्नधान्याची व नित्योपयोगी वस्तूंची जाफनाला मदत पाठविली. श्रीलंका सरकारने तमिळ लोकांच्या बाबतीत दडपशाहीचे धोरण सुरूच ठेवले. तमिळ अतिरेक्यांच्या कारवायाही चालूच राहिल्या. त्यामुळे श्रीलंकेतील परिस्थिती गंभीर बनली. या प्रश्नात भारताशिवाय अन्य कोणताच देश आपल्याला मदत करू शकणार नाही याची श्रीलंका सरकारला जाणीव झाली. श्रीलंकेचे अध्यक्ष जयवर्धने यांनी पंतप्रधान राजीव गांधींशी संपर्क साधला. उभय नेत्यांत वाटाघाटी होऊन जुलै, १९८७ मध्ये **'राजीव-जयवर्धने करार'** झाला. त्या कराराची कलमे पुढीलप्रमाणे : (१) श्रीलंकेतील उत्तर आणि पूर्व तमिळ बहुल प्रांत एकत्र करावे. सत्तेचे पुरेसे विकेंद्रीकरण व्हावे. (२) एलटीटीई संघटना बरखास्त करावी व त्या संघटनेच्या सदस्यांनी आपली शस्त्रे सरकारकडे जमा करावीत. (३) श्रीलंकेने विनंती केल्यास भारतीय सैन्य श्रीलंका सरकारच्या मदतीला पाठविण्यात यावे.

तथापि, राजीव-जयवर्धने करार प्रत्यक्ष कृतीत येऊ शकला नाही. श्रीलंका सरकारवर आमचा विश्वास नसल्याचे सांगून एलटीटीईने शस्त्रे खाली ठेवण्यास नकार दिला. त्या संघटनेने राजीव-जयवर्धने कराराला मोठ्या अनिच्छेने मान्यता दिली होती. परंतु त्यांनी करारावर स्वाक्षऱ्या केल्याच नाहीत. कराराच्या तरतुदीनुसार अध्यक्ष जयवर्धने यांनी

भारताची लष्करी मदत मागितली. राजीव गांधींनी भारतीय शांतिसेना श्रीलंकेत पाठविली. मात्र भारतीय सैन्य तेथे विचित्र अवस्थेत सापडले. भारतीय लष्कराला तेथील तमिळ जनतेचा विरोध व श्रीलंकेच्या स्थानिक नागरिकांच्या नाराजीला तोंड द्यावे लागले. **जयवर्धनेंच्या जागी रणशिंगे प्रेमदास श्रीलंकेचे अध्यक्ष झाले.** त्यांनी भारत सरकारने आपले सैन्य काढून घ्यावे असा आग्रह धरला. टप्प्याटप्प्याने सैन्य मागे घेण्यास राजीव गांधींनी मान्यता दिली. १९८९ च्या भारतातील निवडणुका संपल्या आणि श्रीलंकेतील भारतीय सैन्याची शेवटची तुकडी परत आली. श्रीलंकेतील गुंतागुंतीच्या प्रकरणामुळे राजीव गांधींचा बळी गेला.

**अलिप्ततावादी चळवळीला योगदान :** अलिप्ततावादी चळवळ (नाम-Non-Alignment Movement-NAM) हा राजीव गांधींच्या आवडीचा विषय होता. राजीव गांधींनी त्या चळवळीला आण्विक नि:शस्त्रीकरण हे नवीन उद्दिष्ट दिले. त्यामुळे बदलत्या जागतिक परिस्थितीच्या संदर्भात त्या चळवळीची प्रस्तुतता टिकून राहिली.

**संरक्षण सिद्धता व बोफोर्स प्रकरण :** राजीव गांधींनी देशाच्या संरक्षण सिद्धतेवर पुरेपूर लक्ष दिले. लष्कराच्या आधुनिकीकरणाला त्यांनी संमती दिली व त्यामुळे संरक्षणावरील खर्च दुप्पट झाला. त्यांनी क्षेपणास्त्रनिर्मिती प्रकल्पाला अधिक गती दिली. 'त्रिशूल' आणि 'पृथ्वी' या मध्यम पल्ल्याच्या क्षेपणास्त्रांची व 'अग्नी' या दूर पल्ल्याच्या क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणी त्यांच्या कारकिर्दीत पार पडली. भारतीय आरमाराच्या विकासाचा कार्यक्रमही हाती घेण्यात आला. भारतीय बनावटीचा रणगाडा विकसित करण्यास त्यांनी मान्यता दिली. देशाची संरक्षण सिद्धता विकसित करत असतानाच संरक्षण साहित्य खरेदीच्या एका व्यवहारातील कथित भ्रष्टाचारामुळे राजीव गांधींच्या राजकीय कारकिर्दीला ग्रहण लागले.

१६ एप्रिल, १९८७ रोजी पी. व्ही. सिंग यांच्या संरक्षण मंत्रिपदाच्या राजीनाम्यानंतर काही दिवसांतच बोफोर्स प्रकरण पुढे आले. त्याबाबत स्वीडिश रेडिओवर सर्वप्रथम बातमी आली. **बोफोर्स ही हावित्झर नावाच्या तोफांचे उत्पादन करणारी स्वीडिश कंपनी होती.** या बोफोर्स कंपनीबरोबर भारताला ४१० हावित्झर तोफा पुरविण्याचा करार करण्यात आला होता. याबाबत जो अंतिम व्यवहार झाला त्यात बोफोर्स कंपनीने भारतीय अधिकाऱ्यांना व सत्तारूढ काँग्रेस पक्ष सदस्यांना ६० कोटी रुपयांच्या बरोबरीचे परकीय चलन लाच म्हणून दिले होते, अशी माहिती त्या बातमीतून प्रसृत झाली. भारतीय वृत्तपत्रांनी याची मोठी बातमी प्रसिद्ध केली. **'इंडियन एक्सप्रेस'** व **'हिंदू'** या वृत्तपत्रांनी या बातमीला राजकीय स्वरूप दिले व राजीव गांधींवरच टीकास्त्र सोडले. राजकीय विरोधकांनी हा पैसा राजीव गांधी व त्यांचे कुटुंबीय यांना मिळाल्याचा आरोप

केला. यामुळे देशातील वातावरण कलुषित झाले. राजीव गांधी यांना आपण व आपले कुटुंब या प्रकरणात निर्दोष असल्याचे पटवून देणे अत्यंत कठीण होऊन बसले.

**१९८९ च्या निवडणुका**

राजीव गांधींच्या प्रशासनाला बोफोर्स व कथित भ्रष्टाचाराचा कलंक लागला. १९८९ च्या निवडणूक वर्षात हा आरोप पुन:पुन्हा करण्यात येऊ लागला. संयुक्त संसदीय समितीच्या अहवालात राजीव गांधींना पूर्ण निर्दोष घोषित करण्यात आले, मात्र कॅगच्या (महालेखापालाच्या) अहवालात मात्र तोफा खरेदीची प्रक्रिया व आनुषंगिक काही गोष्टींवर ताशेरे होते. विरोधकांनी कॅगचा अहवाल हाच राजीव गांधींच्या भ्रष्टाचाराचा पुरावा आहे म्हणत त्यांच्या राजीनाम्याची मागणी केली. अशा परिस्थितीत राजीव गांधी १९८९ च्या लोकसभा निवडणुकीला सामोरे गेले. या वेळी देशातील लोकमत राजीव गांधी व काँग्रेस पक्ष यांना प्रतिकूल असल्याचे जाणवत होते. १९८९ च्या निवडणुकीत राजीवजींच्या नेतृत्वाखाली काँग्रेस पक्षाचा पराभव झाला. काँग्रेस पक्षाला एकूण १९७ जागा आणि ३९.५ टक्के मते मिळाली. लोकसभेत काँग्रेसच सर्वांत मोठा पक्ष असूनसुद्धा आपण सरकार बनविण्यास उत्सुक नसल्याचे राजीव गांधींनी जाहीर केले. स्थिर सरकारअभावी मे, १९९१ मध्ये देशात लोकसभेच्या मध्यावधी निवडणुका जाहीर झाल्या. या निवडणूक प्रचार दौऱ्यात तमिळनाडूमध्ये **श्रीपेरांबुदूर** येथे मानवी बाँबस्फोटात राजीव गांधींची हत्या झाली.

**कारकिर्दीचे मूल्यमापन**

राजीव गांधी पंतप्रधानपदी विराजमान झाले तेव्हा राजकीयदृष्ट्या अननुभवी होते. परंतु आपल्या कार्यकालात देशासमोरच्या अनेक समस्या सोडविण्यात ते यशस्वी झाले होते. श्रीलंकेतील तमिळांचा प्रश्न सोडला तर त्यांचे परराष्ट्रीय धोरण अत्यंत यशस्वी ठरले होते. महासत्ता व शेजारी देश यांच्याशी असलेले संबंध सुधारू लागले होते. जागतिक राजकारणात त्यांच्या नेतृत्वामुळे भारताची प्रतिष्ठा बरीच उंचावली होती. देशाची अर्थव्यवस्था समाधानकारक होती. देशाच्या आर्थिक विकासाच्या वाढीचा दर प्रतिवर्षी ५.५ टक्के इतका त्यांच्या कारकिर्दीत गाठला गेला होता. संगणकीकरण हा त्यांचा मोठा प्लस पॉईंट होता. संगणकीकरणाची कास धरून त्यांनी माहिती तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात भारताला जगात अग्रेसर बनविले. देशातील गरीब जनतेच्या उन्नतीसाठी त्यांनी हाती घेतलेले कार्यक्रम, साक्षरता अभियान, पिण्याच्या पाण्याचा पुरवठा, लसीकरण व पंचायती राज्य या बाबतीत त्यांनी घेतलेल्या पुढाकारामुळे भारताच्या ग्रामीण भागाचा कायापालट झाला. **२१ व्या शतकात पदार्पण करण्याची पूर्वतयारी** ही संकल्पना भारतीय जनमानसात रुजविण्याचे श्रेय नि:संशयपणे राजीव गांधी यांच्याकडेच जाते.

## विद्यापीठीय स्वरूपाचे प्रश्न

**प्रश्न १ : खाली दिलेल्या पर्यायांतून योग्य पर्याय निवडून रिकाम्या जागा भरा.**

१. राजीव गांधी .... मध्ये प्रथम लोकसभेवर निवडून गेले.

*(अ) १९८०* *(ब) १९८१* *(क) १९८३* *(ड) १९८४*

२. राजीव–लोंगोवाल करारामुळे ..... राज्यात शांतता स्थापन प्रस्थापित होण्याची अपेक्षा होती.

*(अ) आसाम* *(ब) हरियाना* *(क) मिझोराम* *(ड) पंजाब*

३. ..... साली पक्षांतर बंदी कायदा संसदेने मंजूर केला.

*(अ) १९८५* *(ब) १९८६* *(क) १९८८* *(ड) १९८९*

४. मार्च, १९८९ मध्ये भारत सरकारने .... या शेजारी देशावर आर्थिक नाकेबंदी लादली होती.

*(अ) बांगला देश* *(ब) नेपाळ* *(क) मालदीव* *(ड) म्यानमार*

५. गोवा या केंद्रशासित प्रदेशाला ..... मध्ये वेगळ्या राज्याचा दर्जा मिळाला.

*(अ) १९८४* *(ब) १९८५* *(क) १९८६* *(ड) १९८७*

**प्रश्न २. टीपा लिहा.**

(अ) आसाम करार (ब) संगणकीकरण कार्यक्रम

(क) महासत्तांशी संबंध (ड) श्रीलंकेची समस्या

(इ) बोफोर्स प्रकरण (फ) पक्षांतर बंदी कायदा

**प्रश्न ३. खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१. राजीव गांधींनी पंजाब समस्या सोडविण्यासाठी केलेल्या उपाययोजनेची चर्चा करा.

२. राजीव गांधींच्या प्रमुख अंतर्गत सुधारणांचा आढावा घ्या.

३. राजीव गांधींच्या परराष्ट्र धोरणाची ठळक वैशिष्ट्ये सांगा.

❁❁❁

प्रकरण ४

# पी. व्ही. नरसिंह राव कालखंड

## (P. V. Narasimha Rao Period)



पी. व्ही. नरसिंह राव

**पी. व्ही. नरसिंह राव (१९२१–२००४) :** हे भारताचे दहावे पंतप्रधान होते. १९९१ ते १९९६ हा त्यांचा पंतप्रधानपदाचा कार्यकाल होता. पंतप्रधान पदावरील त्यांच्या निवडीला राजकीयदृष्ट्या खास महत्त्व होते. बिगर हिंदी भाषिक दक्षिण भारतातील ते पहिले पंतप्रधान होते. देशातील मोठे आर्थिक स्थित्यंतर आणि देशाच्या राष्ट्रीय सुरक्षिततेवर दुष्परिणाम करणाऱ्या घटना घडत असलेल्या कालखंडात त्यांनी देशाच्या राज्यकारभाराची सूत्रे समर्थपणे सांभाळली. भारतातील आर्थिक सुधारणांचे जनक असलेल्या पी. व्ही. नरसिंहरावांचे भारतात खुल्या बाजारी अर्थव्यवस्थेचा प्रारंभ करून दिवाळखोरीच्या उंबरठ्यावर असलेल्या राष्ट्राला पुन्हा योग्य मार्गावर आणणारा प्रवर्तक म्हणून आजही कृतज्ञतापूर्वक स्मरण केले जाते. भारतातील आर्थिक सुधारणांच्या इतिहासावर त्यांनी आपला कायमचा ठसा उमटविला. ते एक स्वातंत्र्यसैनिक, द्रष्टे नेते, मुत्सद्दी, थोर विद्वान आणि बहुभाषाविद होते. त्यांना राजकारण वगळून इतर अनेक विषयांत रस होता. साहित्य आणि संगणक हे त्यांच्या विशेष आवडीचे विषय होते. ते विविध सतरा भाषा बोलू शकत होते.

पंतप्रधान नरसिंह राव यांनी आपल्या देशातील जुनाट परवाना पद्धत बरखास्त केली. देशातील ऐतिहासिक स्वरूपाचे आर्थिक स्थित्यंतर घडवून आणण्यासाठी त्यांनी डॉ. मनमोहन सिंग या अराजकीय विख्यात अर्थतज्ज्ञांची देशाचे अर्थमंत्री म्हणून नियुक्ती केली. नवीन अर्थमंत्र्यानी पंतप्रधानांच्या पाठिंब्याने व आदेशाप्रमाणे भारतातील आर्थिक सुधारणांचा जागतिकीकरणाच्या दृष्टिकोणातून प्रारंभ केला. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या (International Monetary Fund-IMF) निदेशाची अंमलबजावणी करून दिवाळखोरीच्या

वाटेने निघालेल्या आपल्या देशाची कोसळणारी अर्थव्यवस्था वेळीच सावरली. नरसिंह राव यांच्या नंतरचे देशाचे पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी व डॉ. मनमोहन सिंग यांनी त्यांचा आर्थिक सुधारणा कार्यक्रम पुढे चालू ठेवला.

अल्पमतातील सरकारचे प्रमुख असताना कठोर राजकीय व आर्थिक निर्णयाची विधेयके संसदेकडून संमत करून घेण्याच्या त्यांच्या कौशल्यामुळे त्यांचा 'चाणक्य' असा उल्लेख होत असे.

त्यांची पंतप्रधान पदावरील कारकीर्द भारताच्या इतिहासात तीन गोष्टींमुळे महत्त्वाची ठरली. (१) भारतीय अर्थव्यवस्थेचे नेहरूंच्या संमिश्र अर्थव्यवस्थेकडून खुल्या बाजारी अर्थव्यवस्थेकडे झालेले स्थित्यंतर. (२) भारतीय जनता पक्ष या उजव्या विचारसरणीच्या मोठ्या राजकीय पक्षाचा काँग्रेसला पर्याय म्हणून झालेला उदय. (३) उत्तर प्रदेशात अयोद्धेतील बाबरी मशिदीचा विध्वंस व त्यातून भडकलेल्या देशातील स्वातंत्र्योत्तर काळातील सर्वांत भीषण हिंदू-मुस्लीम जातीय दंगली.

### पूर्वायुष्य

पी. व्ही. नरसिंह राव यांचा जन्म आंध्र प्रदेशात करीमनगर जिल्ह्यातील वंगारा गावी सामान्य तेलगू ब्राह्मण शेतकरी कुटुंबात २८ जून, १९२१ रोजी झाला. विद्यार्थीदशेत 'वन्दे मातरम्' गीत गाण्यावर निजामी राजवटीच्या बंदी विरुद्धच्या विद्यार्थ्यांच्या निदर्शनात सहभागी झाल्यामुळे १९३८ साली हैद्राबादच्या उस्मानिया विद्यापीठ कॉलेजमधून त्यांची हकालपट्टी झाली. त्यांनी आपले उच्च शिक्षण फर्ग्युसन कॉलेज, पुणे व हिस्लॉप कॉलेज, नागपूर येथून पूर्ण केले. त्यांनी BSc. व LL.B पदव्या प्राप्त केल्या. त्यानंतर त्यांनी हैद्राबाद येथे काही काळ वकिली केली. त्यांचे मराठी भाषेवर चांगले प्रभुत्व होते. प्रसिद्ध मराठी कादंबरीकार **ह. ना. आपटे यांच्या 'पण लक्षात कोण घेतो' कादंबरीचे तेलगू भाषांतर केले.**

### राजकीय कारकीर्द

राव यांनी भारतीय स्वातंत्र्यसंग्रामात विशेषत: 'छोडो भारत' आंदोलनात सक्रिय सहभाग घेतला होता. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर ते काँग्रेस पक्षाचा सक्रिय कार्यकर्ता म्हणून पूर्ण वेळ राजकारणात सहभागी झाले. १९५७ साली ते प्रथम आंध्र प्रदेश विधानसभेत निवडून आले. १९६२ साली त्यांचा राज्य मंत्रिमंडळात समावेश होऊन त्यांनी अनेक महत्त्वाच्या खात्यांचा कारभार सांभाळला. काँग्रेस पक्षातील १९६९ च्या फुटीच्या वेळी ते इंदिरा गांधींच्या पाठीशी राहिले. तेव्हापासून ते इंदिरा गांधींचे निष्ठावान सहकारी

बनले. त्यांना आंध्रचे मुख्यमंत्री म्हणून दोन वर्षे काम करण्याची संधी मिळाली. त्यांची मुख्यमंत्री पदाची कारकीर्द जमीन सुधारणा व तेलंगणामध्ये कमाल जमीनधारणा कायद्याची केलेली कठोर अंमलबजावणी यामुळे लोकांच्या अद्याप आठवणीत आहे.

१९७२ साली त्यांची लोकसभेवर पहिल्यांदा निवड झाली. त्यांनी केंद्रात गृह, संरक्षण, परराष्ट्र व्यवहार इत्यादी महत्त्वाची खाती समर्थपणे सांभाळली. १९९१ साली मात्र प्रकृती अस्वास्थ्यामुळे सक्रिय राजकारणातून निवृत्त होण्याचा त्यांनी निर्णय घेतला. परंतु त्याच वेळी काँग्रेस अध्यक्ष व माजी पंतप्रधान राजीव गांधी यांची हत्या झाली. १९९१ च्या निवडणुकीत काँग्रेस पक्षाला लोकसभेत सर्वांत जास्त जागा मिळाल्या होत्या. अशा परिस्थितीत नरसिंह राव यांनीच पक्षनेतृत्व करावे असा पक्षपातळीवर निर्णय झाला. अशा प्रकारे परिस्थितीच्या दबावामुळे सक्रिय राजकारणात त्यांचे पुनरागमन झाले. अल्पमतातील काँग्रेस सरकारचे नेतृत्व करण्याची संधी त्यांना लाभली. ती जबाबदारी त्यांनी कौशल्याने पार पाडली. पंतप्रधान पदी विराजमान झाल्यावर त्यांनी आंध्र प्रदेशातील नंद्याळ लोकसभा मतदार संघाकडून पोटनिवडणूक लढविली आणि पाच लाखांच्या विक्रमी मताधिक्याने ते विजयी झाले.

**राव यांनी देशाच्या आंध्र, महाराष्ट्र आणि ओडिसा अशा वेगवेगळ्या राज्यांतून निवडणुका लढवल्या व जिंकल्या.**

**आर्थिक सुधारणा**

नरसिंह रावांनी पंतप्रधान पदाची सूत्रे हाती घेतली तेव्हा देशाची अर्थव्यवस्था वाईट अवस्थेत होती. आंतरराष्ट्रीय संस्थांच्याकडून घेतलेल्या कर्जांची परतफेड करणे भारताला अशक्य होऊन देश थकबाकीदार किंवा नादार बनला होता. अशा परिस्थितीत राव यांनी धाडसाने देशाला आर्थिक उदारीकरणाच्या नवीन टप्प्यावर आणले. देशाची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी पंतप्रधान नरसिंह राव यांनी नवीन आर्थिक धोरण आखले. **उदारीकरण, खासगीकरण व जागतिकीकरण** ही नवीन आर्थिक धोरणाची ठळक वैशिष्ट्ये होती. नवीन धोरणानुसार आर्थिक सुधारणा अमलात आणण्यासाठी त्यांनी नामवंत अर्थतज्ज्ञ डॉ. मनमोहन सिंग यांची देशाचे अर्थमंत्री म्हणून नेमणूक केली. त्यांनी भारतातील परकीय गुंतवणूक, भांडवल रोखे बाजार (Capital market) अंतर्गत उद्योगधंदे आणि व्यापार व्यवस्था या क्षेत्रांत प्राधान्याने सुधारणा केल्या.

डॉ. मनमोहन सिंग यांच्या आर्थिक सुधारणांची उद्दिष्टे (१) अंदाजपत्रकीय तूट कमी करणे (२) सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगधंद्यांचे खासगीकरण करणे (३) पायाभूत सुविधा क्षेत्रातील गुंतवणूक वाढविणे अशी होती.

व्यापार क्षेत्रात सुधारणा करून, भागभांडवलातील परदेशी प्रत्यक्ष गुंतवणुकीच्या नियमात बदल करून, परकीय कर्जे स्थिर राखून, (stabilizing external loans) परराष्ट्र व्यापारासाठी भारत खुला करण्यास त्यांनी प्रारंभ केला.

**महत्त्वाच्या सुधारणा**

१. 'मत्ता वितरणाचा नियंत्रक' (Controller of Capital Issues) पद रद्द करण्यात आले.

२. १९९२ मध्ये 'भारताचे रोखे व व्यवस्थापन मंडळ कायदा' (SEBI = Securities and Exchange Board of India Act) करून त्या मंडळाला (SEBI) ला सर्व रोखे बाजारातील मध्यस्थांची नोंद व नियमन करण्याचे कायदेशीर अधिकार देण्यात आले.

३. १९९२ मध्ये भारतातील भाग बाजार (Share market) परदेशी संस्थात्मक गुंतवणूकदारांना मुक्त केला आणि भारतीय व्यवसाय संस्थांना आंतरराष्ट्रीय बाजार पेठांतून भांडवल उभारण्याची मुभा देण्यात आली.

४. १९९४ मध्ये संगणकीकृत राष्ट्रीय रोखे बाजार (Computerized National Stock Exchange) सुरू करण्यात आले.

५. आयात-निर्यात कर कमी करण्यात आले.

६. संयुक्त प्रकल्पातील परकीय गुंतवणुकीची मर्यादा ४० टक्क्यांवरून ५१ टक्क्यांपर्यंत वाढवून भागभांडवलातील परदेशी प्रत्यक्ष गुंतवणूक (Foreign Direct Investment) वाढविण्यास प्रोत्साहन दिले.

७. देशातील किमान ३५ उद्योगधंद्यांतील परकीय प्रत्यक्ष गुंतवणुकीबाबतच्या मान्यता प्रक्रिया सुटसुटीत करण्यात आल्या.

वरील सर्व आर्थिक सुधारणांच्यामुळे भारतीय अर्थव्यवस्था नरसिंह राव यांच्या कार्यकालात विकासाच्या मार्गावर आली.

**परराष्ट्र धोरण**

राव यांचे परराष्ट्र धोरण वास्तववादी होते. भारताचे परराष्ट्र व्यवहार हाताळताना त्यांच्या अंगचे मुत्सद्देगिरीचे गुण फार उपयोगी पडल्याचे आढळते. पश्चिम युरोप, अमेरिका व चीन यांच्याशी सख्य वाढवून त्यांच्याबरोबरच्या राजनैतिक संबंधांना बळकटी आणण्याचे राव यांचे धोरण व प्रयत्न होते.

रावांच्या परराष्टमंत्री पदाच्या कार्यकाळात इस्राईलबरोबर भारताचे राजनैतिक संबंध काही काळ गुप्तपणे सक्रिय झाले होते. १९९२ मध्ये भारताचे इस्राईलशी असणारे संबंध

उघड करण्याचा निर्णय त्यांनी घेतला. त्याबरोबर इस्राईलला नवी दिल्ली येथे आपला राजदूतावास (embassy) सुरू करण्याची परवानगी दिली.

भारतातील बुद्धिवंतांना पाकिस्तान भारतविरोधी दहशतवादी कारवायांना खतपाणी घालत असल्याच्या वास्तवाकडे आंतरराष्ट्रीय समुदायाचे लक्ष वेधण्यासाठी पद्धतशीर मोहीम उघडण्याचे त्यांनी आवाहन केले. आपली मोहीम हाणून पाडण्याच्या अमेरिकेच्या प्रयत्नाने नाउमेद न होण्याचा सल्ला द्यायला ते विसरले नाहीत.

भारताच्या परराष्ट्र धोरणाला रावांनी 'पूर्वेकडे पहा' (Look East) असे अभिनव वळण दिले. त्यामुळे भारत 'आशियान' (Association of South East Asian Nations-ASEAN) च्या अधिक जवळ जाऊ शकला.

चीनचा भारताबद्दलचा संशय, चिंता वाढू नये यासाठी तिबेटचे धर्मगुरू दलाई लामा यांच्यापासून दूर राहण्याचे भारताने ठरविले.

इराणशी मैत्रीचे संबंध वाढविण्याच्या धोरणाचा राव यांनी जोरदार पुरस्कार केला. त्या धोरणाचा भारताला लगेचच चांगला फायदा झाला. मार्च, १९९४ मध्ये संयुक्त राष्ट्रसंघाच्या मानवी हक्क आयोगाच्या जिनेव्हातील बैठकीत पाकिस्तानच्या पंतप्रधान बेनझीर भुत्तो यांनी जम्मू-काश्मीरमधील मानवी हक्क परिस्थितीबद्दल एक ठराव मांडण्याचा प्रयत्न केला. परंतु चीन व इराणच्या विरोधामुळे तो अयशस्वी झाला.

### आपत्ती व्यवस्थापन

१२ मार्च, १९९३ रोजी मुंबईत बॉंबस्फोट मालिका घडून आली. त्यामध्ये प्रचंड जीवित व वित्तहानी झाली. पंतप्रधान राव यांनी बॉंबस्फोटानंतर मुंबईला स्वतः भेट दिली आणि बॉंबस्फोटात पाकिस्तानचा हात असल्याचे आढळताच त्यांनी आपल्या गुप्तचर विभागाला अमेरिका, इंग्लंड आणि इतर पश्चिम युरोपीय देशांतील गुप्तचर संघटनांच्या दहशतवाद विरोधी तज्ज्ञांना मुंबईतील भीषण परिस्थितीची पाहणी करण्यासाठी निमंत्रित करण्याचे आदेश दिले. त्यांच्या या भूमिकेची सर्वत्र प्रशंसा झाली.

### आव्हानांचा मुकाबला

पंतप्रधान नरसिंह राव यांनी आपल्या कार्यकालात काही कठीण आव्हानांचा मोठ्या धैर्याने, यशस्वी मुकाबला केला. त्यांची आपण थोडक्यात चर्चा करूया.

**१. आर्थिक उदारीकरण धोरणाचा अवलंब :** १९९१ साली भारत आर्थिक दिवाळखोरीच्या उंबरठ्यावर होता. उदारीकरणामुळे भारतीय अर्थव्यवस्था सुधारेल आणि त्यामुळे देशाचा फायदा होईल अशा निष्कर्षाप्रत पंतप्रधान आले. अर्थव्यवस्थेची नव्या

धोरणाप्रमाणे उद्दिष्टे साध्य करण्यासाठी त्यांना सक्षम अर्थमंत्री पाहिजे होता. त्यासाठी त्यांनी प्रथम **विख्यात अर्थतज्ज्ञ, रिझर्व्ह बँकेचे माजी गव्हर्नर व लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्सचे पूर्वीचे संचालक आय. जी. पटेल** यांना विचारणा केली. परंतु त्यांनी नकार दिला. त्यानंतर रावांनी **दुसरे नामवंत अर्थतज्ज्ञ व रिझर्व्ह बँकेचे माजी गव्हर्नर डॉ. मनमोहन सिंग यांची देशाचे नवे अर्थमंत्री म्हणून नेमणूक केली.** राव यांच्या आर्थिक उदारीकरणाच्या नीतीवर देशातील समाजवाद्यांनी टीका केली.

**२. फुटीरतावादी चळवळींना पायबंद :** राव यांनी पंजाबातील फुटीरतावादी चळवळीचा यशस्वीपणे मुकाबला करून काश्मीरमधील फुटीरतावादी चळवळ निष्प्रभ करून टाकली. पंजाबमध्ये निवडणुका घेण्याचा धाडसी निर्णय त्यांनी घेतला. निवडणूक प्रक्रियेला कितीही कमी प्रतिसाद मिळाला तरीही पंजाबमध्ये निवडणुका घेण्याचा पक्का निर्धार करून त्यांनी तो अमलात आणला.

काश्मीरमधील परिस्थिती हाताळताना अमेरिकी सरकार व प्रे. क्लिंटन यांच्यामुळे मर्यादा पडत होत्या. तरीसुद्धा भारत सरकारने दहशतवाद विरोधी पहिला कायदा **(Terrorist and Dispuptive Activities (Prevention) Act-TADA)** मंजूर केला आणि लष्कराला काश्मीर खोऱ्यातील घुसखोऱ्यांना उखडून टाकण्याचे आदेश दिले. परंतु अत्यंत यशस्वी लष्करी मोहिमेनंतरसुद्धा जम्मू–काश्मीरमधील सुरक्षिततेची स्थिती भयावह बनली. त्याचा राज्यातील पर्यटन व व्यापार यांच्यावर विपरीत परिणाम झाला. राज्यातील परिस्थिती सुधारण्यासाठी केंद्र सरकारने तेथे खास पोलीस पथके तैनात केली. मात्र स्थानिक लोकांनी केंद्रीय पोलिसांच्याबद्दल गंभीर तक्रारी करून त्यांच्याकडून स्थानिक लोकांवर बलात्कार, अपहरण, खोट्या आरोपावरून अटक असे अत्याचार होत असल्याचे आरोप केले.

**३. बाबरी मशिदीचा विध्वंस व जातीय दंगली :** १९८६ मध्ये उद्भवलेला अयोध्येतील बाबरी मशिदीसंबंधींचा तंटा, हिंदू–मुस्लीम कलह व मोठ्या प्रमाणावर दंगे, हिंसाचार यांना कारणीभूत ठरला. त्यामुळे सरकारपुढे एक जटिल समस्या उभी राहिली. संपूर्ण देशाच्या शांततेवर व स्थैर्यावर त्याचे पडसाद उमटले.

१९८० च्या दशकाच्या उत्तरार्धात **भारतीय जनता पक्ष व विश्वहिंदू परिषद यांनी राम जन्मभूमीचा प्रश्न राष्ट्रीय राजकारणाच्या केंद्रस्थानी आणला.** त्यांनी त्यासाठी अयोध्या परिसरात व देशभर व्यापक निषेध मोर्चे, सभा, परिषदा आयोजित केल्या. ६ डिसेंबर, १९९२ रोजी विहिंपच्या कार्यकर्त्यांनी मोगल राजवटीचा संस्थापक बाबराने बांधलेली

लायबर व्हॅन - आयोग - बाबरी मशिद .
U.P. कल्याणसिंग - मुख्यमंत्री



अयोध्येतील बाबरी मशीद उद्ध्वस्त केली. मशिदीची जागा राम जन्मभूमी असल्याचे मानले जाते. वादग्रस्त बांधकामाच्या विध्वंसाच्या वृत्ताला आंतरराष्ट्रीय प्रसारमाध्यमातून मिळालेल्या प्रसिद्धीमुळे देशात भीषण जातीय दंगली भडकल्या. दिल्ली, मुंबई, कलकत्ता, भोपाळ, अहमदाबाद, हैद्राबाद इत्यादी शहरांत जातीय असंतोषाला आवर घालणेसुद्धा अतिशय अवघड झाले.

पंतप्रधान नरसिंह राव बाबरी मशिदीचे रक्षण करू शकले नाहीत, त्यांनी कर्तव्यात कसूर केली, तेच जातीय दंगलींना जबाबदार होते, असे बेछूट आरोप करण्यात आले. त्यामुळे सरकारने जातीय दंगलींची चौकशी करण्यासाठी नंतर 'लायबर व्हॅन आयोगाची' नेमणूक केली. आयोगाने चौकशी दरम्यान केंद्र सरकारची भूमिका मान्य केली व चौकशीअंती पंतप्रधान राव या प्रकरणात निर्दोष असल्याचा निवाडा दिला. जातीय दंगलींच्या हाताळणी बाबत केंद्र सरकारची भूमिका थोडक्यात पुढीलप्रमाणे होती.

केंद्र सरकार अल्पमतात असल्यामुळे ते कमकुवत होते. कायदा व सुरक्षितता हे विषय राज्य सरकारच्या कार्यकक्षेत येत असल्यामुळे राव यांना अयोध्येत केंद्रीय सुरक्षा दल तैनात करणे किंवा राज्यात राष्ट्रपती राजवट लागू करणे शक्य नव्हते. तसे केले असते तर तो राज्याच्या कामकाजात केंद्र सरकारचा अनावश्यक हस्तक्षेप झाला असता. त्यामुळे अनिष्ट पायंडे पडले असते. संघराज्याच्या रचनेवर त्याचा दुष्परिणाम झाला असता. परिस्थिती गंभीर असताना उत्तर प्रदेशातील कल्याण सिंग सरकार बरखास्त करणे उपयोगी ठरणार नव्हते. केंद्र सरकारने उत्तर प्रदेश सरकारला मंदिर-मशीद प्रकरणात जैसे थे परिस्थिती राखण्याची सक्त सूचना वारंवार दिली होती. परंतु उत्तर प्रदेशच्या कल्याण सिंग सरकारने परिस्थितीचे गांभीर्य ओळखले नाही. वादग्रस्त वास्तू व राज्यातील कायदा व सुव्यवस्थेला निर्माण झालेल्या धोक्याकडे सरकारने जाणूनबुजून दुर्लक्ष केले. त्याचप्रमाणे उत्तर प्रदेशच्या राज्यपालांचा राज्यातील परिस्थितीबद्दलचा अहवाल वस्तुनिष्ठ नव्हता.

१० हजार ठार, लाखो विस्थापित .

**४. किल्लारी (लातूर) भूकंप :** १९९३ च्या लातूर जिल्ह्यातील किल्लारी येथील विनाशकारी भूकंपात दहा हजार लोक ठार झाले आणि लाखो लोक विस्थापित झाले. या भीषण नैसर्गिक आपत्तीच्या वेळी पंतप्रधान नरसिंह राव यांनी आधुनिक तंत्रज्ञान व साधनसामग्री यांचा वापर करून मोठ्या प्रमाणात मदत कार्यक्रम राबविले. त्याचप्रमाणे संकटग्रस्त लोकांना दिलासा देण्यासाठी व पुनर्रचना कामाच्या संघटनासाठी तंत्रज्ञान व

साधनसामग्रीचा कुशलतेने वापर करण्यात आला. भूकंप या नैसर्गिक आपत्तीवर मात करण्यासाठी पंतप्रधानांना महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री शरद पवार यांचे बहुमोल सहकार्य लाभले. आपत्ती निवारणासाठी शासनाने द्रुतगतीने अमलात आणलेल्या उपाययोजनांची सर्वत्र प्रशंसा झाली.

**भ्रष्टाचाराचे आरोप व निरपराधित्व**

नरसिंह राव यांना त्यांचा पंतप्रधानपदाचा कार्यकाल संपल्यानंतर तीन प्रकरणांत भ्रष्टाचाराच्या आरोपांना तोंड द्यावे लागले.

**(अ)** जुलै, १९९३ मध्ये राव सरकारवर विरोधकांनी संसदेत अविश्वास ठराव मांडला. अल्पमतातील सरकार आपले बहुमत सिद्ध करू शकणार नाही असे वाटले होते. राव यांनी झारखंड मुक्ती मोर्चाचे सदस्य व संभवत: जनता दलातील फुटीर सदस्यांना मध्यस्थांमार्फत लाखो रुपयांची लाच देऊन अविश्वास ठरावावरील मतदानाच्या वेळी त्यांनी सरकारला पाठिंबा द्यावा अशी व्यवस्था केली होती असा आरोप झाला. झारखंड मुक्ती मोर्चाचे एक सदस्य शैलेंद्र महातो माफीचा साक्षीदार झाले. त्यांनी आपल्याला लाच दिल्याचे कबूल केले. १९९६ मध्ये रावांचा कार्यकाल संपल्यावर या केसचा तपास जारीने झाला. अनेक वर्षांच्या कायदेशीर खटपटीनंतर २००० साली खास न्यायालयाने राव व त्यांचे मध्यस्थ असलेले सहकारी मंत्री बुटासिंग यांना दोषी ठरवून तीन वर्षे सश्रम कारावास व प्रत्येकी एक लाख रुपये दंडाची शिक्षा दिली. त्यावर दिल्ली हायकोर्टात अपील होऊन आरोपींना जामीन मंजूर झाला. यथावकाश हायकोर्टाने खास न्यायालयाचा निकाल रद्द ठरवून राव व बुटासिंग यांना दोषमुक्त जाहीर केले.

**(ब)** नरसिंह राव, त्यांचे सहकारी मंत्री के. के. तिवारी, चंद्रास्वामी व के. एन. अगरवाल यांनी विश्वनाथ प्रताप सिंग यांचा मुलगा अजेय सिंग यांनी सेंट किटस् बेटावरील **फर्स्ट ट्रस्ट कार्पोरेशन बँकेमध्ये** खाते उघडून त्यात आपल्या वडिलांच्यासाठी २१ दशलक्ष डॉलर्स ठेवले होते, असे दर्शविणारी खोटी कागदपत्रे तयार केल्याचा आरोप वरील सर्वांच्यावर करण्यात आला. हे प्रकरण संभवत: १९८९ मध्ये घडले. तथापि, रावांची पंतप्रधान पदाची कारकीर्द संपल्यावर १९९६ मध्ये सी. बी. आय. ने त्यांच्यावर आरोप दाखल केला. परंतु त्या केसशी त्यांचा संबंध दाखविणाऱ्या पुराव्याअभावी त्यांची एक वर्षाच्या आत निर्दोष सुटका करण्यात आली.

**(क)** लखुभाई पाठक या इंग्लंडमधील भारतीय व्यावसायिकाने चंद्रास्वामी, के. एन. अगरवाल ऊर्फ मामाजी व नरसिंह राव यांनी आपल्याला एक लाख डॉलर्सला

23 Dec 2004 . दिल्ली मृत्यु अटॅक
'The insider'



फसविले आहे, असा आरोप केला. भारतासाठी पेपर पल्पच्या पुरवठ्याचे कंत्राट मिळवून देण्याच्या हमीबद्दल त्यांनी सदर रक्कम दिली होती. शिवाय त्याला चंद्रास्वामी व त्यांचा सचिव यांच्या सरबराईवर जादा तीस हजार डॉलर्स खर्च करावे लागले होते. २००३ मध्ये या खटल्यातून राव व चंद्रास्वामी दोषमुक्त झाले. अशा प्रकारे नरसिंह रावांची त्यांच्यावर आरोप ठेवण्यात आलेल्या सर्व खटल्यांतून मृत्यूपूर्वी निर्दोष मुक्तता झाली होती.

१९९६ च्या निवडणुकीत काँग्रेस पक्षाचा पराभव झाला. काँग्रेस नेत्यांनी पक्षाच्या पराभवासाठी राव यांना जबाबदार ठरवून काँग्रेस अध्यक्ष पदावरून त्यांना पायउतार व्हायला लावले व त्या जागी सीताराम केसरी यांची निवड केली. **नरसिंह राव यांनी काँग्रेस पक्षाचे 'इंदिरा काँग्रेस' हे नाव बदलून 'भारतीय राष्ट्रीय काँग्रेस' हे मूळ नाव वापरात आणले.**

२३ डिसेंबर, २००४ रोजी नरसिंह राव यांचे दिल्लीत हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. हैद्राबाद येथे त्यांच्यावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. 'The insider' या त्यांच्या आत्मचरित्रात त्यांच्या राजकीय क्षेत्रातील अनुभवाचे चित्रण आले आहे.

## विद्यापीठीय स्वरूपाचे प्रश्न

**प्रश्न १ : खाली दिलेल्या पर्यायांतून योग्य पर्याय निवडून रिकाम्या जागा भरा.**

१. नरसिंह राव यांनी. ...... मधून निवडणूक लढविली नव्हती.
*(अ) आंध्र (ब) ओडिसा (क) कर्नाटक (ड) महाराष्ट्र*

२. ..... ला नरसिंह राव यांच्या कार्यकालात नवी दिल्ली येथे आपला राजदूतावास (embassy) सुरू करण्यास परवानगी मिळाली.
*(अ) इस्राईल (ब) इराण (क) बांगला देश (ड) म्यानमार*

३. ..... मध्ये अयोद्धेतील बाबरी मशिदीचा विध्वंस करण्यात आला.
*(अ) १९८६ (ब) १९८९ (क) १९९२ (ड) १९९४*

४. सेबी (SEBI) कायदा ..... साली मंजूर करण्यात आला.
*(अ) १९९१ (ब) १९९२ (क) १९९३ (ड) १९९४*

५. सेंट किटस् बेटावरील बँकेतील कथित व्यवहार .... यांच्याशी निगडित होता.

(अ) चरणसिंग (ब) चंद्रशेखर

(क) मोरारजी देसाई (ड) व्ही. पी. सिंग

**प्रश्न २ : टीपा लिहा.**

(अ) बाबरी मशीद विध्वंस (ब) डॉ. मनमोहन सिंग

(क) लखुभाई पाठक प्रकरण (ड) भूकंप आपत्ती निवारण.

**प्रश्न ३ : खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१. पी. व्ही. नरसिंह राव यांच्या आर्थिक सुधारणांची चर्चा करा.

२. पी. व्ही. नरसिंह राव यांच्या परराष्ट्र धोरणाचा आढावा घ्या.

३. पी. व्ही. नरसिंह राव यांनी पंतप्रधान पदाच्या कार्यकालात ज्या आव्हानांना तोंड दिले त्याचे परीक्षण करा.

❖❖❖